N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

## (Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर शहर

**P.S.**(ठाणे): सदर बाज़ार

**Year** (वर्ष): 2024

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0352

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):17/05/2024 22:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी): पहर 6

**Date From** (दिनांक पासून): 17/05/2024

**Date To** ( दिनांक पर्यंत): 17/05/2024

**Time From** (वेळेपासून): 16:55 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 18:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 17/05/2024

**Time** (वेळ): 22:40 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 032

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 17/05/2024 22:55 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

उत्तर, 2 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सोलापुर महानगपालिका,येथील मुख्य लेखापाल कार्यालय,सोलापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.सुरज दादासो शिंदे
(b) **Father's Name** (वडील चे नाव) : दादासो शिंदे
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साई माऊली, सव्हे नंबर 20,कलनी क्रमांक 06, विजयनगर, दिघ,पुणे , सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साई माऊली, सव्हे नंबर 20,कलनी क्रमांक 06, विजयनगर, दिघ,पुणे , सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403625818

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. गोपाळ सावरय्या मंदोल्लु | | | 1. 102 जय प्लाझा अपार्टमेंट , होटगी रोड,सोलापुर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दिनांक 17.05.2024

मी श्री.सुरज दादासो शिंदे,वय 26 वर्षे,व्यवसाय-ठेकेदार, रा.साई माऊली, सव्र्हे नंबर 20, कॉलनी क्रमांक 06, विजयनगर, दिघी पुणे - 411015 समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मो.नं. 9403625818.

मी वरील ठिकाणी राहण्यास असुन, सोलपुर महानगरपालिका विभागत ई-निविदा प्रक्रिया व्दारे मंजुर होणारे शासकीय कामे करत असतो. त्याप्रमाणे मला दि. 04.11.2023 रोजी ई-निवीदा प्रक्रियेव्दारे सोलापूर महानगरपालिका कार्यालय, सोलापूर येथे ए.सी. (एअर कंडिशन मशीन) बसविण्याचे 13,05,498/- रुपयाचे काम मिळाले होते. मला मिळालेल्या ई-निवीदा प्रमाणे काम पुर्ण करुन शासकीय नियमाप्रमाणे केलेल्या कामाचे बिल मंजुर होवून दि. 15.03.2024 रोजी मिळाले होते. व मी मिळालेल्या कामाचे बिलाची प्रत मिळणेकरीता सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथील कनिष्ठ श्रेणी लिपीक, श्री. मंदोल्लू यांचेकडे पाठपुरावा करत असताना, आज रोजी श्री. मंदोल्लू, कनिष्ठ श्रेणी लिपीक, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी मला मिळालेल्या कामाचे बिलाची प्रत देणेकरीता बिलाचे एक टक्का रक्कम प्रमाणे 13,000/- रुपये लाचेची मागणी केली.

मला मिळालेल्या कामाचे बिलाची प्रत देणेकरीता मागणी करण्यात आलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याने कनिष्ठ श्रेणी लिपीक, श्री. मंदोल्लु यांचेविरुध्द योग्य ती कारवाई होणे करिता मी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापुर समक्ष जावुन लाच मागणीची तक्रार नोंदविली केली. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पोनि कोळी यांनी तहसिल कार्यालय, उत्तर सोलापुर येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवुन त्यांची श्री.अस्मल शेख, तलाठी व तुकाराम माने, तलाठी अशी ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. पोनि कोळी यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी सोलापूर महानगरपालिका येथील लिपीक श्री. मंदोल्लु यांचेविरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. पोनि कोळी याचे सांगण्यावरुन मी माझी तक्रार लेखी स्वरुपात लिहुन दिली. त्यावर मी, पोनि कोळी व दोन्ही पंच यांनी वाचुन सहया केल्या.

त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणे असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी आम्हास व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला व माझ्या सोबत पंच नं 1 शेख यांना सुचना दिल्या की, आम्ही सोलापुर महानगरपालिका येथे जावुन कनिष्ठ श्रेणी लिपीक श्री.मंदोल्लु यांची भेट घेवुन तेथे त्याचे मंजुर बिलाची प्रत मिळण्यासंदर्भात चर्चा करावी. श्री. मंदोल्लु यांनी लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे व लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयात परत यावे. अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 शेख यांना दिल्या.

त्यानंतर मला व पंच नं.1 शेख यांना सोलापुर महानगरपालिका येथे पाठविणे अगोदर पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून आम्हास कनिष्ठ श्रेणी लिपीक श्री.मंदोल्लु यांचे भेट घेवून पडताळणी करण्यास जाण्यास सांगितले. त्यावरून मी, पंच नं. 1 शेख असे माझे मोटारसायकलने सोलापुर महानगरपालिका मधील मुख्यलेखा विभागात जावुन लिपीक श्री. मंदोल्लु यांची भेट घेवुन माझ्या मिळालेल्या कामाचे मंजूर बिलाची प्रत देण्याबाबत चर्चा करत असताना, लिपीक श्री.मंदोल्लु यांनी माझ्याकडे बिलाची प्रत देण्यासाठी माझे मंजुर बिलाचे 1 टक्केप्रमाणे म्हणजे 13000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यामध्ये मी तडजोड केली असता त्यांनी 10000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी एटीएम मधुन काढुन आणतो असे बोलुन मी व पंच श्री. शेख असे लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय येथे परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील रेकार्डर काढून पंच नं.1 शेख व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी, व पंचांनी रेकॉर्डरमध्ये माझ्यात आणि लिपीक श्री. मंदोल्लु यांच्यात झालेले संभाषण

त्यांच्याकडील लॅपटॉपला व्हाईस रेकॉर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये लिपीक श्री.मंदोल्लु यांनी माझे मिळालेल्या बिलांची प्रत देण्यासाठी 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाच रक्कम मुख्यलेखा कार्यालय, सोलापुर महानगरपालिका सोलापुर येथे घेवुन येण्यास सांगीतलेचे स्पष्ट झाले.

त्यानंतर पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी लिपीक श्री. मंदोल्लु यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 10,000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 20 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांचे सुचनेवरुन पोना/जाधव यांनी एका को-या कागदावर लिहुन घेवून त्यावेर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहलेल्या कागदावर सह्या केल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयात करण्यात आली. सदर अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा माझ्या पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आल्या.

त्यानंतर यातील कनिष्ठ लिपीक श्री. मंदोल्लु यांच्यावर सोलापुर महानगरपालिका कार्यालय, सोलापुर येथे परिसरात लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे अनुषगाने पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून मी व पंच नं 1 शेख असे माझ्या मोटारसायकलवरुन व पोनि कोळी व पंच न 02, सापळा पथक असे शासकीय वाहनाने असे आमचे पाठीमागे येवुन सोलापुर महानगरपालिका कार्यालय येथें सापळा लावुन थांबले व मी व पंच क्र 01 असे सोलापुर महानगरपालिका येथील मुख्य लेखा विभागात श्री. मंदोल्लु यांचेकडे जावून त्यांची भेट घेतली असता, श्री.मंदोल्लु यांनी हाताचे इशा-याने लाचे रक्कमेची मागणी करुन ती टेबलवर असलेल्या प्लास्टिक डब्यामध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावर मी माझ्या पॅन्टच्या मागचे उजव्या बाजूचे खिशात ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून लिपीक श्री. मंदोल्लु यांनी सांगीतल्याप्रमाणे त्यांचे टेबलवर असलेल्या प्लॉस्टिकचे डब्यामध्ये ठेवली. त्यांनतर मी लाच रक्कम स्विकारलेचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोनी कोळी व पंन 02 सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन लिपीक श्री. मंदोल्लु यांना पकडले

सदर ठिकाणी पोनि कोळी यांनी लिपीक श्री. मंदोल्लु यांचे नाव गांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. गोपाळ सावरय्या मंदोल्लु, वय 45 वर्षे, पद-कनिष्ठ श्रेणी लिपीक, मुख्य लेखापाल कार्यालय, धनादेश विभाग, सोलापुर महानगपालिका, सोलापूर असे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही लाचलुचपत प्रतिबंध विभाग, सोलापुर कार्यालय येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दिनांक 17.05.2024 रोजी 16.55 वा. ते 18.00 वा. चे दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. गोपाळ सावरय्या मंदोल्लु, वय 45 वर्षे, पद- कनिष्ठ श्रेणी लिपीक, मुख्य लेखापाल कार्यालय, धनादेश विभाग, सोलापुर महानगपालिका यांनी माझे भंजुर बिलाची प्रत देण्याकरीता माझ्याकडे 13,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकरण्याचे मान्य करुन ती लाच रक्कम स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी श्री. गोपाळ सावरय्या मंदोल्लु, पद- कनिष्ठ श्रेणी लिपीक, मुख्य लेखापाल कार्यालय, धनादेश विभाग, सोलापुर महानगपालिका यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून, तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

5



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ajit shankar lakade(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ajit shankar lakade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

Received FIR copy